महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


पत्र क्र.नाविमं प.मा./प.उ.मा./५१४१
नागपूर, दिनांक 16 /11/2022

**प्रति,**

मुख्याध्यापक/प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग,
नागपूर
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र( इ.12 वी ) व माध्यमिक शालान्त प्रमाणनपत्र ( इ.10 वी ) फेब्रुवारी–मार्च 2023 परीक्षेबाबत.**

**संदर्भ :–** पत्र क्रमांक रा. मं./परीक्षा– ६/६२५१, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मंडाळामार्फत फेब्र/मार्च– 2023 मध्ये घेण्यात येणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.12वी ) व माध्यमिक शालान्त प्रमाणनपत्र ( इ.10 वी ) परीक्षेची संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

राज्यामध्ये कोविड–19 चा प्रादुर्भाव कमी झाला असल्यामुळे फेब्रुवारी–मार्च 2023 मध्ये आयोजित करण्यात येणा–या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे घेण्यात येणार असून, याबाबत खालील सूचना आपण आपले स्तरावर विद्यार्थी, पालक व सर्व संबधित घटक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

1) सदर परीक्षा 100% अभ्यासक्रमावर आधारित घेण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी सर्व परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार निर्धारित कालावधीतच पार पाडावयाच्या आहेत.

**2) परीक्षार्थ्याने प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान 30 मिनिटे अगोदर आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

3) प्रचलित पध्दतीनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना, निर्धारित केलेल्या केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहेत.

4) सदर परीक्षांच्या वेळेमध्ये कोणतीही वाढीव वेळेची सवलत देण्यात येणार नसून वेळापत्रकांमध्ये नमूद केलेल्या वेळेनुसार परीक्षा घेण्यात येणार आहेत.

5) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–2017/( 118/17 )/एस.डी.–6, दि. 16 ऑक्टोबर, 2018 नुसार पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना असणा–या सर्व सोयी सवलती देण्यात येतील.

( चितांमण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.